# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ६६-२३ दिनांक :- २८/०२/२०२३

# वाहन चोरी व जबरी चोरी करणा-या सराईत आरोपीतांस अटक गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांची कामगिरी.

-------00000-------

दिनांक १८/०२/२०२३ रोजी रात्री १०.३० वा. ते दि. १९/०२/२०२३ रोजी १०.०० वा. च्या दरम्यान मेहता चक्कीचे बाजुला, भाटपाड, चंदनसार विरार पुर्व येथे फिर्यादी नामे सोनु भगवान झा, वय २९ वर्षे रा. अष्टविनायक नगर, साईराम चाळ, भाटपाडा, चंदनसार, विरार पुर्व यांची ५०,०००/- रु. किं. ची एक्टीवा ६ जी मोटार सायकल ही पार्क करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करून नेली होती. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणेत गु.र.नं. १८०/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई-विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासुन मोटारसायकल, रिक्षा चोरी व जबरी चोरी गुन्हयांच्या प्रमाणात दिवसें-दिवस वाढ होत असल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणण्याबात सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार युनिटचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे मिळालेल्या माहितीवरुन आरोपीत नामे रईस अकबर शेख वय २६ वर्षे, रा. तांदुळ बजार, चंदनसार रोड, विरार पुर्व यास दिनांक २१/०२/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास करुन त्याचेकडुन नमुद गुन्हा तसेच चोरीच्या २ रिक्षा व ७ मोटारसायकल असा एकुण ४,५५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील गुन्हे उघडकीस आणण्यात आले. नमूद गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा कक्ष -३ करीत आहे.

## -: उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ.क्र. | पो.स्टे | गुन्हा रजि. नंबर व कलम |
|---|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे | १८०/२०२३ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे. |
| २. | विरार पोलीस ठाणे | ११४१/२०२२ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे. |
| ३. | विरार पोलीस ठाणे | १०३/२०२३ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे. |
| ४. | विरार पोलीस ठाणे | ५९०/२०२२ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे. |
| ५. | वालीव पोलीस ठाणे | ७५/२०१९ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे. |
| ६. | नालासोपारा पोलीस ठाणे | ११/२०२३ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे. |

तसेच दिनांक ०३/०२/२०२३ रोजी १०.१५ ते १०.३० वाजताचे सुमारास फिर्यादी नामे सुशांत शशिकांत चव्हाण, वय ३० वर्षे, राहणार ग्लोबलसिटी विरार पश्चिम हे फोनवर बोलत पायी अग्रवाल ग्रुप बाजुकडे जात असताना पतंजली दुकानाच्या समोर त्यांचे पाठीमागुन एक

मोटारसायकलवर दोन अनोळखी इसम आले व त्यातील मागे बसलेल्या इसमाने त्यांचे हातातील मोबाईल जबरीने हिसकावुन चोरी करुन पळुन गेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अर्नाळा सागरी पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ५२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमूद गुन्हयात गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणव्दारे मिळालेल्या माहितीवरुन आरोपीत नामे १) संजु राजु पाटील, वय २५ वर्षे, रा. धानिवबाग, नालासोपारा पुर्व, २) आमिर तजम्मुल शेख, वय २२ वर्षे, रा. अन्नाडिस कंम्पाऊन्ड, संतोषभुवन, नालासोपारा पुर्व, यांस दिनांक २४/०२/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपुर्वक तपास करुन गुन्हयात वापरलेले वाहन व जबरी चोरी झालेला १,३३,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

## -: उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ.क्र. | पो.स्टे | गुन्हा रजि. नंबर व कलम |
|---|---|---|
| १. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ५२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| २. | विरार पोलीस ठाणे | १३३/२०२३ भा.दं.वि. सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ३. | पेल्हार पोलीस ठाणे | ८९०/२०२२ भा.दं.वि. सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, राकेश पवार, पो.अंम. सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार तसेच सफौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी केली.

---------ooo---------